# जाहीर आवाहन

**संदर्भ**:- १.The Gazzette of India, Extraordinary, Part-II-Section-3-Subsection (ii), Ministry of Environment, Forest & Climate Change, Notification, New Delhi, 8th April 2016

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसुची 'ड' प्रकरण-१४, स्वच्छता विषयक तरतुदी

उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये प्रकाशित **Solid Waste Management Rules 2016** अन्वये नमुद ४(१)( a) नुसार Every generator shall

Segregate and store the waste generated by them in three separate streams namely bio-degradable, non-biodegradable and domestic hazardous waste in suitable bins and handover segregated waste to authorized waste pickers or waste collector as per the direction or notification by the local authorities from time to time.

सबब,सदरहू जाहिर आवाहन नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व कचरा उत्पादकांना व नागरीकांना सुचित करणेत येते कि, आपल्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे जागीच ओला (wet waste) व सुका (dry waste) व घरगुती धोकादायक (domestic hazardous waste) असे तीन प्रकारात वर्गीकरण करणेत यावे.

१. ओला कचरा (wet waste) म्हणजे स्वंयपाक घरात निर्माण होणारा घनकचरा जसे कि, भाजीपाला, चहा पावडर, अंडयाचे टरफल, केळीचे व फळांचे साल इत्यादी.

२. सुका कचरा (dry waste) म्हणजे, पुर्नवापर करता येऊ शकणारा कचरा जसे कि, वृत्तपत्रे, कागद, पुष्ठा, दुधाची पिशवी इत्यादी

३. घरगुती धोकादायक (domestic hazardous waste) म्हणजे, नष्ट केलेले रंगाचे डब्बे, किटकनाशक डब्बे, सी एफ एल बल्ब, टयुबलाईट, मुदतबाहय औषधे, तुटलेली थर्मामीटर, घरगुती वापर झालेल्या बॅटरी, संसर्गीत कापूस बोळे, घरगुती वापरलेल्या सुया इत्यादी.

तरी, सर्व कचरा उत्पादकांनी व नागरीकांनी वरीलप्रमाणे **जागीच कचऱ्याचे वर्गीकरण (Source Segregation) करून तशाप्रकारेच स्वतंत्र कचरादाणीतुन कचरा घंटागाडीमध्ये** पुढील विल्हेवाटीकामी महानगरपालिकेकडे द्यावा.

Sd/-

**अतिरिक्त आयुक्त,**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**